## निशाण क्र.११६ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.१ याने वादी व वादीचे विधिज्ञांना प्रत्येक नेमल्या तारखेस न्यायालयात उपस्थित राहणेस व उपस्थित न राहिल्यास दाव्याची एकतर्फा सुनावणी घेवून दावा निकाली करणेचा आदेश होणेसाठी दाखल केला आहे. त्याच्या म्हणण्यानुसार त्याची आजी कै. गिरजाबाई शंकर राणे यांचे पती कै. शंकर मुकुंद राणे हे सन १९५९ रोजी मयत झाले. दावा मिळकतीत तोड झालेली झाडे कै. गिरजाबाई हिने १९६१ ते १९६५ च्या दरम्याने लागवड केली आहेत. तिने स्वकष्टाने लागवड केलेल्या झाडांचे तिने गुरांपासून व जंगली प्राण्यांपासून संरक्षण केले आहे. दावा मिळकतीवर तिला नैतिक तसेच कायदेशीर अधिकार आहे. सदर दावा मिळकत कै. गिरजाबाई राणे हिने स्वकष्टाने उभी केलेली तिची स्वत:ची मिळकत आहे, त्यामुळे त्या मिळकतीस सामाईक मिळकत असे म्हणता येणार नाही. दि.१८/१२/१९७२ इ. रोजी कै. गिरजाबाई शंकर राणे हिने तिच्या स्वत:च्या घरासहीत दावा मिळकत विना मोबदला बक्षिसपत्राने प्रतिवादी क्र.१ याच्या नावे केली आहे आणि त्याची नोंद फेरफार क्र.११०२ ने दि.२३/११/१९७४ रोजी गाव कागदोपत्री झाली आहे. याची माहिती कै. गिरजाबाई राणे हिच्या दोन्ही मुलींना आहे. सदर दोन्ही मुलींनी बक्षिसपत्रास केव्हाही हरकत घेतली नाही तसेच त्याविरूध्द् अपीलही केले नाही. सदर मिळकत सन १९७२ पासून प्रतिवादी क्र. १ याच्या खुद्द कब्जेवहिवाटीस असल्यामुळे अधिकार अभिलेखास पीकपाहणी सदरी प्रतिवादी क्र.१ याचे नाव खुद्द म्हणून नोंद आहे. त्यामुळे सन १९७२ पासून २०१६ पर्यंत म्हणजे सुमारे ४४ वर्षानंतर बक्षिसपत्रास हरकत घेणे हे न्याय संगत नाही. कै. गिरजाबाईला प्रतिवादी क्र.१ याची आर्थिक व वैदयकीय मदत होती याचे पुरावे न्यायालयासमोर सादर केले आहेत. दावा मिळकतीमधील झाडे सन १९५९ पुर्वीची आहेत हे वादी यांनी प्रथम सिध्द् करावे आणि नंतर लिलावाची मागणी करावी. प्रतिवादी क्र.१ हे कायदेशीर

तिस—या हिश्श्याचे हिस्सेदार आहेत व वादी हे एक नाममात्र हिश्श्याचे हिस्सेदार आहेत. वादी यांना सहहिस्सेदारांची संमति न घेता न्यायालयात लिलावाची मागणी करण्याचा अधिकार नाही. वादी हे न्यायालयाचा अमुल्य वेळ खर्ची घालत आहेत. वादी तसेच वादी यांचे विधिज्ञ हे दि. १४/०२/२०१८ व दि.२१/०२/२०१८ इ. रोजी न्यायालयामध्ये गैरहजर राहिले आहेत. वादी हे वेळकाढू धोरण अवलंबित असून सन २०१८ च्या पावसाळयाची वाट पाहत आहेत. सन २०१८ चा पावसाळा चालू झाल्यावर तोड झालेले लाकूड सामान कुजून नष्ट होणार आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र. १ याचे आर्थिक नुकसान कसे होईल याची वादी वाट पाहत आहेत. या सर्व कारणास्तव वादी व त्याच्या विधिज्ञांना प्रत्येक नेमल्या तारखेस न्यायालयात उपस्थित राहणेस आदेश व्हावेत व ते उपस्थित न राहिल्यास दाव्याची एकतर्फा सुनावणी घेवून दावा निकाली करावा अशी विनंती प्रस्तुत प्रतिवादीने केली आहे.

२. वादीने या अर्जास म्हणणे दाखल केले आहे. त्याच्या म्हणण्यानुसार सदरचा अर्ज निरर्थक आहे. सबब, अर्ज खर्चासह नामंजूर करणेत यावा अशी विनंती त्याने केली आहे.

३. वादी, प्रतिवादी क्र.१ तर्फे विद्वान विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकण्यात आला

४. प्रस्तुत कामी नि.क्र.५ च्या अर्जावरील आदेशान्वये प्रतिवादी क्र.१ याने दाव्याच्या अंतिम निकालापावेतो दावा मिळकतीमधील तोडलेली झाडे उचलू नये, वाहतुक करू नये, विक्री करू नयेत असा आदेश दि. ०१/०३/२०१७ इ. रोजी पारित करण्यात आला आहे. तसेच नि.क्र.८० च्या अर्जावरील आदेशान्वये वनपाल देवगड यांनी दावा मिळकतीमधील झाडांची

पाहणी करून तोडलेल्या झाडांची लिलावाद्वारे विक्री करून ही विक्री रक्कम न्यायालयात जमा करावी असा आदेश दि.१७/०६/२०१७ इ. रोजी पारित करण्यात आला आहे. वरील दोन्हीही अर्ज वादीने दाखल केले होते. मात्र, अद्याप सदर तोडलेल्या झाडांची लिलावाद्वारे विक्री झाली नाही असे दिसून येते. यावरून मागील एक वर्षापासून ती तुटलेली लाकडे दावा मिळकतीत पडून आहेत असे दिसून येते. या तोडलेल्या झाडांबाबत योग्य ती पुर्तता न केल्यास ही लाकडे कुजून जातील, परिणामी उभय पक्षकारांचे नुकसान होईल असे मला वाटते. अशा परिस्थितीत वादीने या लाकडांच्या बाबतीत झालेल्या आदेशांची त्वरित पुर्तता करणे आवश्यक वाटते.

५. तसेच मागील दोन ते तीन तारखांना वादी व वादीतर्फे विधिज्ञ गैरहजर असल्याचे दिसून येते. वरील आदेश असताना तोडलेल्या झाडांबाबत कोणतीही कारवाई न करता वादी व त्यांचे विधिज्ञ गैरहजर राहणे उचित वाटत नाही. प्रतिवादी क्र.१ प्रत्येक तारखेस हजर राहतो. सबब, या कारणास्तव वादी व त्याच्या विधिज्ञांनी अपवादात्मक परिस्थिती व्यतिरिक्त या प्रकरणात प्रत्येक तारखेस हजर राहून पुर्तता करणे आवश्यक आहे. मात्र, वादी अशा तारखांना उपस्थित राहिला नाही म्हणून दाव्याची एकतर्फी सुनावणी घेवून निकाल देणे अशी प्रक्रिया नाही हे स्पष्ट करण्यात येते. किंबहुना वादी एखादया तारखेस गैरहजर आहे म्हणून एकतर्फी सुनावणी घेवून तडखाफडकी निकाल देणे न्यायोचित वाटत नाही. वादीने पुरावा देण्याची स्थिती आलेली नाही. त्यामुळे तो गैरहजर आहे म्हणून या क्षणी दावा निकाली करता येणार नाही. परिणामी सदरचा अर्ज अंशतः मंजूर होणेस पात्र आहे. सबब मी खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे:

## **<u>आदेश</u>**

१. अर्ज अंशतः मंजूर करण्यात येतो.

२. वादी व त्याच्या विधिज्ञांनी प्रस्तुत कामी अपवादात्मक परिस्थिती व्यतिरिक्त प्रत्येक तारखेस उपस्थित रहावे असा आदेश पारित करण्यात येतो.

३. वादी उपस्थित न राहिल्यास दाव्याची एकतर्फा सुनावणी घेवून निकाल देण्याची विनंती फेटाळण्यात येते.

४. खर्चाबाबत आदेश नाही.

सही/—
( गि.सु.माने )
दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवगड.

देवगड
दिनांक ११/०४/२०१८